**नियमित दिवाणी दावा नं. १५९/२०१५**

**निशाणी ५ लगत हुकुम**

(पारित दिनांक ३०/०३/२०१६ )

१) वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहिता १९०८ (येथून पुढे 'संहिता' असे संबोधले आहे) चे आदेश क्र. ३९ नियम १, २ प्रमाणे तात्पुरता मनाई हुकुम देण्याबाबत दिलेला आहे.

२) अर्ज व त्यास प्रतिवादी यांनी दिलेले कैफियत सह म्हणणे (नि.१४) चे वाचन केले. अभिलेखाचे अवलोकन केले. वादींतर्फे विधिज्ञ श्री व्ही.एस.कदम व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री एच.ए.पवार यांचा युक्तीवाद ऐकला. मजकूराची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उभय पक्षकारांचे कथन येथे नमूद केले नाही.

३) प्रकरणातील विचाराधीन मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष मी कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीने त्यास सकृतदर्शनी केस आहे हे सिध्द केले आहे काय.? | नाही. |
| २) | न्यायाचा समतोल वादीचे बाजूने आहे हे वादीने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ३) | मनाई हुकुम न दिल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय.? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ४) | काय आदेश.? | अर्ज नामंजूर करणेत आला |

## कारणमिमांसा

## मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत

४) वादीचे असे कथन आहे की त्यांनी मौजे कवठेमहांकाळ येथील बिगरशेती गट नं. १४४८ लागू नं. २ मधील बिगरशेती प्लॉट नं. १५ (अर्ज कलम १ मध्ये सविस्तर वर्णन केलेप्रमाणे) हा दिनांक ०५/०६/२०१३ रोजी श्रीकांत दादू घाडगे यांचेकडून खुषखरेदी घेतला आहे. (येथूपुढे वाद मिळकत ) वादी यांचे नावाची नोंद महसूल अभिलेखास झाली आहे. वरील खरेदीखतपासून वाद मिळकतीमध्ये वादी यांचा कब्जा व वहिवाट आहे. प्रतिवादी यांचा वाद मिळकतीशी काहीही संबंध नाही. असे असताना दिनांक १५/११/२०१५ रोजी प्रतिवादी वाद मिळकतीत झाडे तोडू लागले व वाद मिळकतीमध्ये बांधकाम करणार असे म्हणू लागले.

५) प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये त्यांचा व वादीचा काहीही संबंध नाही असे स्पष्टपणे कबूल केले आहे. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, या न्यायालयास प्रस्तुतचा दावा चालविण्याचा अधिकार नाही. मौजे कवठेमहांकाळ येथील जमीन गट नं. १४४७/६ ही इनाम जमीन प्रतिवादी यांचे वहिवाटीस आहे. वाद गट नं. १४४८ चे मूळ मालक दिगंबर यशवंत पाटील यांनी दिनांक २९/०४/२०१४ रोजी मोजणीसाठी अर्ज दिला होता. त्याप्रमाणे मोजणी होवून गट नं. १४४८ मधील प्लॉट धारकाने प्रतिवादी यांचे वरील गट नंबरमध्ये १२–आर इतके अतिक्रमण केले आहे. सदर अतिक्रमीत क्षेत्रामध्ये वाद मिळकत प्लॉट येतो. वादीने फक्त कागदपत्रे पाहून खरेदी केली आहे. प्रत्यक्षात क्षेत्र जायमोक्यावर नाही. प्रतिवादी १२–आर क्षेत्राचा कब्जा घेतील व त्यामुळे वादी व इतर प्लॉटधारकांना घरे

पाडावी लागतील या भीतीने प्रस्तुतचा खोटा दावा केला आहे. वादीचे कथनाप्रमाणे प्रतिवादीनी कोणत्याही प्रकारचा अडथळा केलेला नाही.

६) दोन्ही बाजूंचे विधिज्ञांनी त्यांचे कथनाशी सुसंगत असा युक्तीवाद केला आहे. वादी व प्रतिवादी यांचे वरील कथनाचे अवलोकन केले असता वाद मिळकतीशी प्रतिवादी यांचा काहीही हक्क हितसंबंध नाही असे त्यांचे स्पष्टपणे कथन आहे. वादी हे मनाई हुकुमासारखी ऐच्छीक दाद मागत आहेत. प्रतिवादी यांचे कथन पाहता वादीने वाद मिळकतीचे स्पष्टपणे असे निश्चित स्थान दयावयास पाहीजे. वादीने मागणी केलेली दाद पाहता स्वतः स्वच्छ हाताने न्यायालयात यावयास पाहीजे. वाद मिळकतीचे स्थान निश्चित नसल्यास आदेशाची अंमलबजावणी करताना कायदा व सुव्यवस्था याचा प्रश्न निर्माण होवू शकतो.

७) वाद मिळकतीचा ७/१२ उतारा (नि.नं.८)चे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी वादी हे वाद मिळकतीचे मालक व कब्जेदार असल्याचे दिसून येते. प्रतिवादींना वादीचे खरेदीखताबद्दल काहीही आक्षेप नाही. वादीने दाखल केलेल्या वाद मिळकतीचे खरेदीखत (नि.नं.३/२) चे प्रमाणीत प्रत चे अवलोकन केले असता त्यामधील चतुःसीमा व अर्जातील चतुःसीमा एकच असल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांचे कथनानुसार सन २०१४ मध्ये गट नं. १४४८ चे मूळ मालकाने मोजणी करुन घेतली आहे. प्रतिवादी यांनी फेरिस्त (नि.नं.२०) सोबत मो.र.नं. २००५/२९–०४–२०१४ चे मोजणीचे छायांकीत नकाशाचे अवलोकन केले असता गट नं. १४४८ चे धारकाने गट नं.१४४७/६ मध्ये १२–आर क्षेत्र अतिक्रमण केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादीने या मोजणी नकाशाच्या अनुषंगाने वाद मिळकत अतिक्रमीत क्षेत्रात येते किंवा नाही याबाबत स्पष्टीकरण करणे आवश्यक होते. वादी यांनी फेरिस्त (नि.नं.२४)सोबत अनुक्रमांक ३ वर वाद गट नंबरचे मूळ मालकाने दिनांक १८/०६/२००४ रोजी मोजणी केल्याचा नकाशा दाखल केला आहे. सदर नकाशाचे अवलोकन केले असता प्रतिवादी यांनी वाद गट नं. १४४८ मध्ये तारेचे कपौंड केल्याचे दाखविलेले आहे. वरील विवेचनावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की सन २००४ मध्ये

प्रतिवादींनी वाद गट नंबरमध्ये तारेचे कपौंड केले होते तर सन २०१४ मध्ये वाद गट नं. १४४८ चे धारकाने गट नं. १४४७/६ मध्ये अतिक्रमण केले आहे. अशा परिस्थीतीमध्ये मनाई हुकुम देताना वादीने वाद गट नं. १४४८ मध्ये त्यांचा प्लॉट नेमका कोठे आहे अगर तो अतिक्रमीत क्षेत्रात आहे का याबाबत कथन करणे आवश्यक आहे. वादीने वादगट नंबर अकृषीक केल्यानंतर भूमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी होवून प्लॉट पडले आहेत याबाबत नकाशा हजर केलेला नाही. यावरही मनाई हुकुम दिलेस प्रतिवादींना अतिक्रमीत क्षेत्राबाबत कारवाई करणेसाठी अडथळा होवू शकतो. वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयात आल्याचे दिसून येत नाही. वादीस सकृतदर्शनी केस नाही. मनाई हुकुम दिलेस वादीपेक्षा प्रतिवादींचे जास्त नुकसान होणार आहे. सबब या मुदयांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक ४ च्या उत्तरांती मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) अर्ज (नि.नं.५)नामंजूर करणेत येतो.

२) अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट.

(खुल्या न्यायालयात घोषीत केला)

सही/---

(स.का.मुळे )

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर

कवठेमहांकाळ जि.सांगली

कवठेमहांकाळ

दिनांक – ३०/०३/२०१६